# मुंबईत गेल्या दहा वर्षात विविध गुन्ह्यांमध्ये 112 टक्क्यांनी वाढ




मुंबई, दि. 18 (एमएमसी न्यूज नेटवर्क): मुंबई शहरामध्ये गेल्या दहा वर्षांत गुन्हेगारीत कमालीची वाढ झाली आहे . 2012 ते 2021 या कालावधीत गंभीर गुन्ह्यामध्ये 112 टक्याने वाढ झाली आहे .अपहरणाच्या गुन्ह्यांमध्ये 650 टक्के तर बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये 235 टक्यांनी वाढ झाल्याचा दावा प्रजा फाऊंडेशन या संस्थेने प्रेस क्लब मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केला.

मुंबईतील पोलिस यंत्रना आणि कायदा व सुव्यवस्थेची सधास्थिती 2022 ‘ या विषय प्रजा फाऊंडेशन तर्फे आज प्रेस क्लब मध्ये हा अहवाल प्रकाशित करण्यात आला. यावेळी प्रजा फाऊंडेशनचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त निताई मेहता, सीईओ मिलिंद मस्के,डायलॉग प्रोग्रामचे प्रमुख योगेश मिश्रा व रिनी चेरीयन उपस्थित होते.

शहरातील गुन्ह्यांची वाढती संख्या आटोक्यात आणण्यासाठी आणि त्यांचे तपासकार्य योग्य रितीने होण्यासाठी कायदा व सुव्यवस्था यंत्रणा सज्ज आणि सक्षम असायला पाहिजे . तपासामध्ये पोलिस निरीक्षक आणि उपनिरीक्षक महत्त्वाची भूमिका निभावतात , परंतु 2022 पर्यंतची आकडेवारी पाहता त्यांची 18 टक्के मंजूर पदे रिक्त आहेत . गुन्ह्यांची संख्या वाढती असल्याने ही पदे तातडीने भरणे आवश्यक आहे . तरच तपासाचे काम वेळेत होईल आणि त्याचा दर्जाही चांगला राहील.

खून , बलात्कार , गंभीर दुखापत इत्यादी वर्ग ॥ च्या गंभीर गुन्ह्यांचे विश्लेषण केले असता महिला व मुलांवरील गुन्ह्यांचे तपासकार्य 2017 मध्ये 72 टक्के प्रलंबित होते जे 2022 मध्ये वाढून 77 टक्के झाले आहे . " असे प्रजा फाऊंडेशनचे सीईओ मिलिंद म्हस्के यांनी सांगितले . " कोविडकाळ वगळता अन्य वर्षांमध्ये न्यायालयीन कारवाईसाठी वेळ लागत असून प्रलंबित सुनावणीच्या खटल्यांचे प्रमाण वाढत चालले आहे . 2017 ते 2021 या दरम्यान वर्ग 2 च्या गंभीर गुन्ह्यांच्या प्रलंबित खटल्यांचे प्रमाण 95 वरून 98 टक्क्यांपर्यंत गेले आहे.Between 2017 and 2021, the proportion of Class 2 felony pending cases increased from 95 to 98 percent.

या व्यतिरिक्त महिला व मुलांवरील गुन्ह्याचे खटले अनुक्रमे 97 आणि 95 टक्के सन 2021 पर्यंत प्रलंबित असल्याचे दिसते . गेल्या सहा वर्षात ( 2016 ते 2021 ) दाखल वर्ग 2 ने गंभीर गुन्हे ( 2,401 गुन्हे ) निकाली आणि मागे घेण्याचा कालावधी पाहता 2021 च्यापर्यंत सुनावणीसाठी प्रलंबित खटांचे निकाल लागायला 34 वर्षे लागतील , तेही याकाळात जर नविन भर पडली नाही तर तंत्रज्ञान आणि व्हचुअल फॉर्मस यांचा वापर करून प्रलंबित खटल्याचे कामकाज वेगाने पूर्ण करता येईल असे मस्के म्हणाले.

सन 2021 मध्ये मुंबईत दाखल झालेल्या 888 बलात्काराच्या गुन्ह्यांपैकी 59 टक्के गुन्हे पोस्को ( POCSO) ( लैंगिक गुन्ह्यापासून मुलांचे संरक्षण कायद्याखाली दाखल झाले आहेत . या सर्व 100 टक्के गुन्हयांमध्ये आरोपी व्यक्ती पीडित व्यक्तीच्या माहितीची असल्याचे दिसून आले . म्हणूनच या गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी शालेय विद्यार्थ्यांमध्ये तसेच अन्य संबंधित स्टेकहोल्डर्समध्ये जाऊन जणजागृती करण्याची आवश्यकता आहे . " असे प्रजा फाऊंडेशनच्या डायलॉग प्रोग्रामचे प्रमुख योगेश मिश्रा यांनी सांगितले .

" POCSO खाली दाखल गुन्ह्याची सुनावणी गुन्ह्याची दखल घेतल्यापासून एक वर्षाच्या आत पूर्ण व्हायला पाहिजे असे हा कायदा सांगतो , पण पोलिसांचे तपासकार्य आणि न्यायालयीन कामकाज या दोन्हींमध्ये बराच वेळ जातो . उदाहरणार्थ , 2021 मध्ये पोस्को खाली दाखल 72 टक्के गुन्ह्याचे तपासकाम प्रलंबित होते आणि ज्यांचे पूर्ण झाले त्यातील 42 टक्के गुन्ह्यामध्ये एक वर्षांहून अधिक कालावधी लागला . 2021 मध्ये याच गुन्ह्यांच्या 60 टक्के खटल्यांमध्ये सुनावणी होऊन निकाल लागण्यासाठी 1 ते 5 वर्षांचा कालावधी लागला . 2021 मध्ये 97 टक्के पोस्को घटले या कायद्याखाली स्थापित विशेष न्यायालयांमध्ये चालले हेही नोंद घेण्यासारखे आहे . 2020 च्या तुलनेत ( 72 टक्के) हे प्रमाण वाढले आहे . " असे मिश्रा म्हणाले .112 percent increase in various crimes in Mumbai in last ten years

ML/KA/PGB
18 Oct .2022

Link: https://mmcnewsnetwork.com/2022/10/112-percent-increase-in-various-crimes-in-mumbai-in-last-ten-years/